जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र- १०६ दिनांक :- २१/०८/२०२६

# " ईद सणाच्या पार्श्वभूमीवर जळगाव पोलिसांची जय्यत तयारी "

## शांतता समिती व मिरवणूक पदाधिकाऱ्यांची बैठक; कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी व्यापक नियोजन

===ooo===

**दिनांक २२ ऑगस्ट २०२६ आगामी ईद-ए-मिलाद सणाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, सण शांततेत व उत्साहात पार पाडणे तसेच मिरवणुकीदरम्यान नागरिकांची सुरक्षितता व वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवणे, या उद्देशाने आज जळगाव पोलीस मुख्यालय येथे शांतता समिती सदस्य तसेच मिरवणुकीच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.**

बैठकीस **जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, महानगरपालिका आयुक्त, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी (SDPO), सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व उपविभागीय दंडाधिकारी (SDM)** हे प्रत्यक्ष तसेच ऑनलाइन माध्यमातून उपस्थित होते.

**बैठकीत देण्यात आलेल्या प्रमुख सूचना :-**

१. मिरवणूक काढण्यासाठी **पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक** असून, परवानगीशिवाय कोणतीही मिरवणूक काढू नये.
२. प्रशासन व पोलिसांनी निश्चित केलेल्या **मिरवणुकीच्या मार्गात कोणताही बदल करू नये.**
३. मिरवणुकीमध्ये **आक्षेपार्य गाणी, घोषणा अथवा वक्तव्ये करू नयेत.**
४. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर **धार्मिक भावना दुखावणाऱ्या किंवा आक्षेपार्ह पोस्ट, फोटो, व्हिडिओ अथवा संदेश प्रसारित करू नयेत.**
५. **परदेशातील राष्ट्रांचे झेंडे अथवा अन्य वादग्रस्त ध्वजांचा वापर करण्यास मनाई** राहील.
६. मिरवणुकीच्या शिस्तबद्ध आयोजनासाठी आवश्यकतेनुसार **स्वयंसेवकांची नियुक्ती** करावी.
७. मिरवणुकीमध्ये झेंडे फिरविणे टाळावे. त्यातून अनावश्यक वाद निर्माण होण्याची शक्यता असल्याने सर्वांनी संयम बाळगावा.
८. मिरवणुकीच्या वेळी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी परिस्थितीनुसार **वाहतूक मार्गात तात्पुरते बदल अथवा डायव्हर्शन** करण्यात येईल.
९. मागील वर्षी ईदच्या अनुषंगाने जळगाव जिल्ह्यात **०७ गुन्हे दाखल झाले होते. यावर्षी ईदचा सण पूर्णपणे शांततेत पार पडावा व कोणताही अनुचित प्रकार घडू नये**, यासाठी सर्वांनी प्रशासन व पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.
१०. **महावितरणने (MSEDCL)** उघडे डीपी बंदिस्त करणे, विद्युत पुरवठा सुरळीत ठेवणे तसेच धोकादायक वायरिंगची पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी.
११. **महानगरपालिकेने मिरवणूक मार्गावरील अतिक्रमणे हटवून रस्ते स्वच्छ व मोकळे ठेवावेत.**
१२. मिरवणूक मार्गावरील **खड्डे बुजविणे तसेच आवश्यक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था** करावी.

## ईदच्या बंदोबस्तासाठी मोठा पोलीस बंदोबस्त :-

ईद सणाच्या अनुषंगाने जळगाव जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

| अधिकारी/बल | संख्या |
|---|---|
| पोलीस अधीक्षक | ०१ |
| अपर पोलीस अधीक्षक | ०२ |
| SDPO | १० |
| प्रोबेशनरी DySP | ०२ |
| पोलीस निरीक्षक | ३० |
| API/PSI | २०० |
| पोलीस अंमलदार | ३४०० |
| RCP | ०८ |
| स्ट्राइकिंग फोर्स | १५ |
| होमगार्ड | १६०० |
| वाहतूक शाखा | १०० |
| SRPF कमांडो | २०० |
| BDDS पथक | ०२ |
| डॉग युनिट | ०४ |
| कंट्रोल रूम मॉनिटरिंग | १५ |
| सोशल मीडिया/सायबर मॉनिटरिंग | १५ |

## पोलीस प्रशासनाची जय्यत तयारी:-

ईद सणाच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्हा पोलिसांकडून प्रतिबंधात्मक व सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

- जिल्ह्यातील **सर्व आवश्यक बैठका पूर्ण** करण्यात आल्या आहेत.
- संवेदनशील व महत्त्वाच्या भागांमध्ये **रूट मार्च घेण्यात येत आहेत.**
- **दंगल काबू योजना व रिहर्सल पूर्ण** करण्यात आली आहे.
- जिल्ह्यात **५,००० पेक्षा अधिक प्रतिबंधात्मक कारवाया** करण्यात आल्या आहेत.
- संबंधित प्रकरणांमध्ये **दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही पूर्ण** करण्यात आली आहे.
- सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर **सतत मॉनिटरिंग व निगराणी** ठेवण्यात येत आहे.
- मिरवणूक व गर्दीच्या ठिकाणी परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी **ड्रोनचा वापर** करण्यात येणार आहे.
- DJ संदर्भात संबंधित पदाधिकारी व आयोजकांच्या **स्वतंत्र बैठका घेऊन आवश्यक सूचना** देण्यात येत आहेत.
- **MSEDCL, PWD, आरोग्य विभाग, महानगरपालिका** तसेच संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या उपाययोजनांसाठी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

**शांतता व सलोखा राखण्याचे आवाहन :-**

ईद हा सण **शांतता, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा वाढविणारा सण** म्हणून सर्वांनी एकत्रितपणे साजरा करावा. मिरवणुकीतील आयोजक, पदाधिकारी, स्वयंसेवक तसेच नागरिकांनी प्रशासन व पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. **कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या तसेच धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या कोणत्याही कृतीची गांभीर्याने दखल घेऊन नियमानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**

*" जळगाव जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने सर्व नागरिकांना ईद सणाच्या हार्दिक शुभेच्छा देत, ईदचा सण शांततेत, उत्साहात व सामाजिक सलोखा राखून साजरा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे "*

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

******************************************************************************






जळगाव जिल्हा पोलीस
ईद-ए-मिलाद
शांतता समिती बैठक
स्थळ : पदमालय हॉल, पोलीस मुख्यालय जळगाव
दि. २२ ऑगस्ट २०२६, वेळ.१२.०० वा
विनीत
श्रीकांत धिवरे (भा.पो.से.)
पोलीस अधीक्षक, जळगाव
रोहन घुगे (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी जळगाव


ईद-ए-मिलाद
शांतता समिती बैठक


जळगाव जिल्हा पोलीस
ईद-ए-मिलाद
शांतता समिती बैठक